दैनिक सत्यप्रभा
शुक्रवार, दि. २४ जून २०२२

## १४ लाखांच्या चोरीचा छडा

# फिर्यादीची पत्नीच निघाली आरोपी

**नांदेड, दि. २३ (प्रतिनिधी) - येथील रेल्वे स्थानक परिसरातील गवळीपूरा भागातील दहा जून रोजी झालेल्या १४ लाखांच्या चोरीचा छडा लावण्यात वजिराबाद पोलिसांना यश आले असून घटनेच्या १३ व्या दिवशी या गुन्ह्यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या गुन्ह्याची आरोपी आपली पत्नीच निघाल्याने फिर्यादीला धक्का बसला आहे.**



गवळीपूरा भागातील अब्दुल गफ्फार कुरेशी यांनी वजिराबाद पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनूसार आठ जून रोजी ते व त्यांची कुटुंबिय हिंगोली नाका परिसरातील दरवेशनगर भागात आपल्या एका नातेवाईकाच्या घरी कार्यक्रमासाठी गेले असताना त्यांच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी रात्री साडे दहा ते नऊ जून च्या मध्यरात्री एक वाजेच्या दरम्यान घरात प्रवेश केला व घरातील १३ लाख रुपये रोख, सोन्याचे गंठन, अंगठी व इतर दागिणे असा एकूण १४ लाखांचा ऐवज चोरून नेला होता. वजिराबाद पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात आरोपींविरुद्ध दहा जून रोजी फिर्यादी फयुम अब्दूल गफ्फार कुरेशी यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करुन सहाय्यक पोलिस निरिक्षक संजय निलपत्रेवार यांच्याकडे तपास सोपविला होता. दरम्यान, पोलिसांनी या चोरीच्या घटनेचा अत्यंत कसोशीने तपास केला. गुन्ह्याची पद्धत आणि प्राप्त झालेल्या इतर माहितीच्या आधारे त्यांना गुन्ह्याचा छडा लावण्यात यश प्राप्त झाले. या गुन्ह्यातील फिर्यादी फयुम कुरेश यांची पत्नी अर्थात घरमालकीनच आरोपी असल्याचे तपासातून निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी फिर्यादीच्या २५ वर्षीय पत्नीस अटक केली असून चोरीस गेलेला सर्व ऐवज पोलिसांना जप्त केला आहे. पोलिस अधीक्षक प्रमोद शेवाळे, अप्पर पोलिस अधिक्षक निलेश मोरे यांनी वजिराबाद ठाण्याचे पोलिस निरिक्षक जगदीश भंडरवार सहाय्यक पोलिस निरिक्षक संजय निलपत्रेवार पोलिस अंमलदार शेख इम्रान, रमेश सुर्यवंशी, शुभांगी कोरेगावे, गजानन किडे, विजय मुंडे, संतोष बेल्लूरोड यांनी या गुन्ह्याचा छडा लावण्यात मोलाची कामगिरी बजावल्या बद्दल त्यांचे कौतूक केले जात आहे.

दरम्यान, सदर गुन्ह्यातील आरोपी महिलेला न्यायालया समोर हजर केले असता, न्यायालयाने तीची एक दिवस पोलिस कोठडीत रवानगी केली आहे.